# गोवा राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ

पिळर्ण औद्योगिक वसाहतीजवळ, साळगाव सेमिनरीसमोर, साळगाव, बार्देश, गोवा ४०३५११

जाहिरात क्र. १०/२०२३

क्र. १/४०/२०२१-पीसीबी/प्रशासन/६७५६ दिनांक: २०/०६/२०२३

## प्रत्यक्ष मुलाखत

गोवा राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ हे एक वर्षाच्या कालावधीकरिता (मुदतवाढ करण्यायोग्य) खालील पदे पूर्णतः कंत्राटी तत्त्वावर भरू इच्छित आहे. जे इच्छुक उमेदवार आवश्यक अर्हतांची आणि अनुभवाची पूर्तता करू शकत आहेत त्यांनी आपल्या शैक्षणिक पात्रतेची मूळ प्रमाणपत्रे, वयाचा दाखला, सक्षम अधिकाऱ्यांनी जारी केलेला १५ वर्षे गोव्यातील रहिवासाचा दाखला, रोजगार विनिमय नोंदणी पत्र, अनुभवाचा दाखला आणि इतर आवश्यक पुरावे आणि त्या कागदपत्रांची एक फोटोकॉपी घेऊन गोवा राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचे कार्यालय, साळगाव, बार्देश, गोवा येथे खाली नमूद करण्यात आलेल्या तारखांना प्रत्यक्ष मुलाखतीकरिता उपस्थित राहावे.

| अनु. क्र. | पदाचे नाव | पदांची संख्या | पात्रता | वेतन | मुलाखतीची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ शोध स्नातक (ज्युनियर रिसर्च फेलो) | ०२ | रसायन/इलेक्ट्रिकल/ पर्यावरणशास्त्र यामधील अभियांत्रिकीचा बॅचलर असावा. | रु. २०,०००/- (एकत्रित प्रती महिना) | २७/०६/२०२३ रोजी (स. ९.३० वा. पासून पुढे) |
| २ | क्षेत्र सहाय्यक (फिल्ड असिस्टंट) | ०३ | विज्ञान शाखेमधील उच्च माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असावा. | रु. १५,०००/- (एकत्रित प्रती महिना) | २७/०६/२०२३ रोजी (दु. २.०० वा. पासून पुढे) |
| ३ | वय | वर नमूद करण्यात आलेल्या पदांकरिता वय हे प्रत्यक्ष मुलाखतीच्या तारखेस ३० वर्षांहून अधिक असू नये. | | | |

सही/-
**सदस्य सचिव**
**गोवा राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाकरिता**

**टीप :**

१. उमेदवाराने आपल्या अर्जासोबत आपली प्रमाणपत्रे/गुणपत्रिका, जन्म दाखला, अनुभवाचा दाखला इत्यादींच्या प्रमाणित फोटो कॉपीज यांच्यासह पासपोर्ट आकारातील छायाचित्र जोडावे आणि मुलाखतीच्या वेळेस सर्व प्रमाणपत्रे/ कागदपत्रे यांच्या मूळ प्रती घेऊन येणे अनिवार्य आहे, नाहीतर त्यांना मुलाखतीस उपस्थित राहण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

२. अपूर्ण अर्ज आणि ज्या अर्जांना समर्थन करणारे दस्तऐवज जोडलेले नसतील अशा पात्रता निकषांची पूर्तता न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज सरसकट नाकारण्यात येतील आणि त्याबाबत पुढे कोणत्याही प्रकारच्या शंका / संपर्क यांना प्रतिसाद दिला जाणार नाही.

डीआय/एडीव्हीटी/६४६/२०२३